**राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या जवाहर / धडक सिंचन विहीर योजनेतील इतर लाभार्थ्यांच्या अपूर्ण विहिरी पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.......**

---

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग (रोहयो)
शासन निर्णय क्र.योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २२ डिसेंबर, २०१४.

संदर्भ - १) शासन निर्णय क्रमांक - योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २३ जानेवारी, २०१४.
२) शासन परिपत्रक क्रमांक - योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४.
३) शासन पत्र क्रमांक अखनि-२०१३/प्र.क्र.३०/ रोहयो-५ दिनांक १ एप्रिल २०१४.
४) शासन परिपत्रक क्रमांक - योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक १६ एप्रिल, २०१४.
५) शासन परिपत्रक क्रमांक - योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २ जुलै, २०१४.

**प्रस्तावना -**

राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत राज्यात जवाहर विहीर योजना तसेच विदर्भातील आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांमध्ये हीच योजना धडक सिंचन विहीर या नावानेअनुदान तत्वावर राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सन २००७-०८ व २००८-०९ मध्ये ५१८०० जवाहर विहीरींचा व ८३२०० धडक सिंचन विहीरींचा लक्षांक ठरवून देण्यात आला आहे. लाभार्थी निकषानुसार इतर लाभार्थ्यांच्या विहीरी पूर्ण करण्यासाठी देय अनुदानात वाढ करण्यात येऊन सदर अनुदान रू. २.५० लक्ष ( रू. दोन लक्ष पन्नास हजार फक्त ) इतक्या मर्यादेत करण्यात आले आहे. इतर लाभार्थ्यांच्या या सर्व विहीरी पूर्ण करण्यास दिनांक ३१ जुलै, २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. काही जिल्ह्यांकडून सदर मुदत वाढवून देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यास अनुसरून मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या जवाहर विहीर व धडक सिंचन विहीर योजनेतील अनुदानात वाढ करण्यात आलेल्या इतर लाभार्थ्यांच्या ज्या अपूर्ण विहीरी पूर्ण करण्यासाठी दिनांक ३१ जुलै, २०१४ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली होती. अशा सर्व विहीरी पूर्ण करण्यासाठी आता दिनांक ३० जून २०१५ पर्यन्त मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. इतर लाभार्थ्यांच्या विहीरी दिनांक ३१ जुलै, २०१४ पर्यन्त पूर्ण करणे बंधनकारक असताना अद्याप काही विहीरी अपूर्णावस्थेत आहेत. सदर विहीरी पूर्ण करण्यासाठी योग्य ती कार्यवाही अथवा उपाययोजना करण्यात आल्याचे दिसून येत नाही. अपूर्णावस्थेत असलेल्या विहीरी कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३०जून, २०१५ पर्यन्त पूर्ण करणे आवश्यक आहे, तेव्हा जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी

याबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा व आवश्यक ते मार्गदर्शन करून कार्यक्रम विहीत कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी. याबाबत यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. तसेच विहीरी पूर्ण न झाल्यास याबाबत संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

३. जवाहर / धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील विहीरी पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना देय होणा-या अनुदानाचे वाटप दिनांक १५ जुलै, २०१५पर्यन्त पूर्ण करण्यात यावे व त्यानंतर उर्वरित निधी शिल्लक राहिल्यास तात्काळ शासन जमा करण्यात यावा. संदर्भाधीन दिनांक १/४/२०१४ च्या पत्रासोबतचे प्रमाणपत्र दिनांक २० जुलै, २०१५ पर्यन्त सादर करण्यात यावे. या कालावधीत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास संबंधित मुख्य लेखा वित्त अधिकारी (CAFO) यांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल. तरी याप्रकरणी अपूर्ण विहीरी दिनांक ३० जून, २०१५ पर्यन्त पूर्ण करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही / उपयायोजना करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१४१२२२१४५१२१७९१६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.**

**( आर. विमला )**
**उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन**
22/12/2014

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) सर्व उपजिल्हाधिकारी ( रोहयो )
४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
५) सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग जिल्हा परीषद
६) मा. सचिव ( रोहयो ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) उप सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सहाय्यक संचालक (लेखा), रोहयो-७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती, रोहयो-५